४७

— जय हिंदमाता —

# — शाहिरी डफ —

*** थाप ५ वी ***

# सिंहगडचा संग्राम

## पोवाडा

ले० प्रल्हादराय जामखेडकर जळगांव पू० खानदेश

आवृत्ती १ ली

वैशाख शु॥ ३ (किंमत २ आणे) शके १८५३

प्रकाशक :- प्र. रं जामखेडकर

जळगांव पू. खा.

मुद्रक :- दत्तात्रय वामन जोशी यांनी आपल्या

" खानदेश छापखान्यात "

( छापिलें )

( लेखकानें सर्व हक्क आपल्या स्वाधीन ठेविले आहेत. )



# प्रस्तावना.

खानदेशांतील प्रसिद्ध शाहीर प्रल्हादराय यांनीं महाराष्ट्राच्या इतिहासांतील ' सिंहगडचा संग्राम ' या वीररसप्रधान कथानकावर रचलेला पोवाडा मराठी वाचकांचे हातीं दिला आहे. अलिकडे जुन्या पोवाड्याच्या चालींवर नवीं नवीं काव्यें प्रसिद्ध होऊं लागलीं असून ' डफावरची थाप ' सहृदय श्रोत्यांच्या कर्णपथद्वारें अंत:करणापर्यंत जाऊन भिडत आहे. महाराष्ट्राच्या उज्ज्वल इतिहासाची स्मृति ताजी करून नवी स्फूर्ति नव्या अंत:करणांना द्यावी असा शाहिरी पोवाड्यांच्या प्रसाराचा मुख्य उद्देश होय. हा उद्देश प्रस्तुत पोवाड्यांत बराच सिद्धीस गेला आहे असें वाचकांच्या निदर्शनास येईल. पोवाडा वाचणाऱ्यापेक्षां ताल सुरावर म्हटलेला ऐकणाऱ्यास तो जास्त परिणामकारक वाटतो हा नेहमींचा अनुभव या पोवाड्याविषयींहि येणार आहे. क्वचित स्थळीं शब्दांची ओढाताण व भाषेचा ग्रामिकपणा वाचकांना कदाचित् अडखळल्यासारखें करील; परंतु, म्हणण्याची धाटणी समजल्यास कांहींच अडचण वाटणार नाहीं.

पोवाड्यांतील तानाजीची प्रतिज्ञा, तो निघाल्यानंतर पालखीचा गोंडा तुटून पडल्यामुळें झालेला अपशकुन, तानाजीचीं अपशकुनास न जुमानतां गड घेण्याची तयारी, तानाजीचें अचाट सामर्थ्य इत्यादि गोष्टी चांगल्या वर्णिल्या आहेत. किल्लेदार उदेभानूचें वर्णन कोणाला अतिशयोक्तीचें वाटेल; पण कित्येक वेळां अशा काव्यांतून

अतिशयोक्ति शोभूनहि जाते. गडावर चढून तानाजीनें चौकी पहारे कापून काढले. किल्यावरील मस्त हत्ती माहतासह कापून काढला व किल्यावरील शिबंदीची पांगापाग झाली हा प्रकार पोवाड्यांत चांगला वाणला आहे. उदेभान व तानाजीचें वर्णन, ऐंशी वर्षांच्या शेलारमामानें उदेभानावर वाघासारखी चाल करून केलेला शिरछेद, या प्रसंगाच्या चारच ओळीं अंगावर रोमांच आणणाऱ्या आहेत. या पोवाड्यांत शाहीर प्रल्हादराय यांनीं सर्वांस समजेल अशीं सोपी भाषा वापरल्या मुळें तो लोकप्रिय होईल अशी आशा आहे. पोवाडे छापून प्रसिद्ध करणें ही पहिली पायरी असून ते गाऊन लोकप्रिय करून दाखविणें ही दुसरी होय. शाहीर प्रल्हादराय यांचा हा पोवाडा असाच लोकप्रिय होईल असा आम्हांस भरंवसा वाटतो.

जळगांव
मिति वै शु. ३
शाके १८५३.

द. वा. जोशी

संपादक प्रागतिक





वंदेमातरम्

# शाहिरी डफ

## थाप ५ वी.

# — सिंहगडचा संग्राम —

## पोवाडा

ले० प्रल्हादराय जामखेडकर

( चाल :-राष्ट्रदेवते प्रमाण करितो, )

### चौक १ ला

" म्हणती शिव प्रभु अवतरले "

शिवरायाचा सिंव्ह तानाजी निधडा सरदार
पोवाडा प्रल्हादराय गाणार ॥धृ॥
महाराष्ट्राच्या दऱ्या दऱ्यांतुनी स्वराज्य स्थापियले ।
म्हणती शिवप्रभु अवतरले ॥
स्वातंत्र्याचा वृक्ष वाढला फुलला जोमानें ।
मराठा सिंची रक्तानें ॥
जिजामातेची नजर गेली गड कोंडाण्यावर ।
म्हणे जासुद धाडा सत्वर ॥
शिवरायाचा होता तळ तो रायगडावर ।
माताप्रताप गडावर ॥
राजेसरी तुम्हीं जेवावें आजि राजगडावर ।
अंचवावें प्रतापगडावर ॥

२

निरोप ऐसा जिजामातेचा कथितों तुम्हांला ।
सर्जारे धांवत ये गडाला ॥
शिवाजी राजे अंगीं चढविती पोषाखा भरजरी ।
पाठिवर ढाल पंच हत्यारी ॥
राया झाला घोड्यावरी स्वार । गडावर निघे सत्वर ॥
पाहि जिजामाता सामोर । केला मुजरा लवुनी त्रीवार ॥
सांग मातोसरी आम्हांस । काय संकट पडलं तुजवर ॥
संकटाशी नच भी बाला । एक इचार मनासी आला ॥
भगवा झेंडा फडफडतो आजि सर्व गडावर ।
नाहीं गड कोंडण्यावर ॥१॥

## चौक २ रा

" बोलवा त्या तानाजीला "

कोंडण्याचें नांव ऐकतां इचार पडे रायाला ।
उदेभान आहे त्या किल्याला ॥
बहुत अवघड गड कोंडाणा नाहीं जागा चढण्याला ।
उभा सुळकाच असे जागेला ॥
[illegible]ळ कोंकण दख्खन शोभे रायाच्या हाती ।
सत्तावीस किल्यांची गणती ॥
गड कोंडण्यावाचुन मागणें मागावें आम्हांला ।
सर्वही गड देऊं तुम्हांला ॥
पुणें प्रांताच्या चौहूं बाजुला तुझाच अम्मल ।
मधेंच कशाला मोंगल ॥
गड कोंडाणा घेऊनी हातीं जोडा राज्यात ।
धडकी भरवा हृदयांत ॥



३

जरी बायाचा असेल तुजला दे गड कोंडाणा ।
दुजा गड येईना मन-मना ॥
शीव-भूपती बोले आइला चला गडावर ।
मनसुबा करुं एकवार ॥
पैजेचा विडा मांडूनी । सर्वांस केलं जाहीर ॥
घेणे आहे गड कोंडाणा । कुणि इडा उचला सामोर ॥
ना उठे कोणी नरवीर । रायाचि मुद्रा गंभीर ॥
बाळपणीचा मैतर माझा दिसेन नयनाला ।
बोलवा त्या तानाजीला ॥२॥

## चौक ३ रा

" राहिले लग्न ठिकाणाला "

तानाजीचे घरीं चालला लग्नाचा सोहळा ।
चढविली हळद रायबाला ॥
शिवरायाचा जासुद पाहुनि मनीं बहु हरकला ।
सुभेदार सदरेला बसलेला ॥
परिसुनिया रायाची आज्ञा कढ आला रक्ताला ।
राहिले लग्न ठिकाणाला ॥
लग्न-मंडप क्षणीं उसळला गर्जे हरहर ।
घालिती समशेरिस कर ॥
माझ्या रायबाचं लगीन करुनि जाव मग युद्धाला ।
सती बोलते तानाजीला ॥
जरी आलों परतून येथें खास करीन लग्नाला ।
हवाला देईन शिवबाला ॥
बारा हजार मावळे हेटकरी घेतले त्यानं दिमतीला ।
सुभेदार निघाले गडाला ॥

४

वरमाईला ऐसे सांगुनि बसला जाऊन पालखीला ।
संगे ढाल तलवार भाला ॥
सवे चालला सेलार मामा ऐंशी वर्षांचा ।
तुटला गोंडा पालखीचा ॥
ब... गत दिसेना आम्हाला दे वावदा युद्धाला ।
परतुन चलावे सदनाला ॥
अपशकुन सारे तडवुन पायीं मिळविन मी मातिला ।
शिवाची शिकवण अम्हाला ॥

चौक ४ था

" बैठकीस त्याच्या कोण गणणार "
समर संत तानाजि दिसतसे भव्य रुबाबदार ।
पाठीवर ढाल कटी तल्वार ॥
दिसतात मिशा गुलछबू सदोदित राहताती ताठ ।
खैराची गांठ दिसे आंगलट ॥
मालुसरा एका दमांत काढी जोर पांच हजार ।
बैठाकिस त्याच्या कोण गणणार ॥
चि...ल होतसे मेहनति जागीं अंगाच्या घामान ।
तिळ पिळुनि काढितसे मूठीन ॥
दांडपट्टा खेळण्यांत पटाइत आणि बार्चे भाला ।
तसाच कारवाइ मध्यें पहिला ॥
तानाजीची हिम्मत ताजी लढवय्या गाजी ।
तसाच तो बंधू सूर्याजी ॥



५

संगे होता सूर्याजी वीर । ते पोचले राजगडावर ॥
शिवाजीस पाहातां सामोर । लवुन करि त्यास जोहार ॥
काय संकट पडलं तुजवर । कां पाचारिलें सत्वर ॥
शिवसर्जा म्हणे वीर वर । तुम्हीं व्हावें जरा हो स्थीर ॥
ठाऊक नाहीं काहीच मजला इचार म्हणे मातेला ।
आतांच येईल बघ भेटीला ॥४॥

चौक ५ वा

" देईन गड कोंडाणा तुला "
माता म्हणे एक पुत्र शिवराय दुजा पुत्र तूं मला ।
आर्ति ओवाळीन मी तुला ॥
राजमाता आरति ओवाळी तानाजी वीराला ।
म्हणे काय ओवाळणी घालुं तुला ॥
तानाजी सुभेदार असे एक हेतू मनांत धरीला ।
पाहिजे गड कोंडाणा मला ॥
तानाजी मावळा बोलला जिजाऊ मातेला ।
देईन गड कोंडाणा तुला ॥
बारा हजार फौजेचा तळ तो गडाखाली पडला ।
द्याव हत्यार समद्या लोकाला ॥
लगिन राह्यलं माझ्या रायबाचं सांगतो आतां तुम्हाला ।
सांभाळा माझ्या रायबाला ॥
मी जरी आलो परतुन तेथून खास करीन लग्नाला ।
ना तर हवाला शिवबाला ॥
बेट्यास द्यावी सरदारी । दिवटि बुधलीचा अधिकारी ॥
आणिक द्यावी बेट्यास । डोंज गांवची पानसूपारी ॥
मालुसऱ्याचा दंड इनाम । राखावि त्यास सुभेदारी ॥

सुभेदारास दिला पोषाख । काढुनिया तो भरजरी ॥
आतां राम-राम घ्यावा आमुचा, जातो युद्धाला ।
भेदाचा भाग पुढल्या चौकाला ॥

चौक ६ वा

" बसावं सांगतो आतां भेदाला "

सार मावळी सैन्य जमल कोंडाण्याच्या पायथ्याला ।
जाग जागीं होता दबा धरीला ॥
भेद आणायास्तव मांडिती शर्तीच्या इड्याला ।
कुणीही उचलाव याला ॥
बारागांव ईनाम, छत्रि घोडा देऊं आम्ही त्याजला ।
कुणीही हात घालिना इड्याला ॥
रणगाजि तानाजी सुभेदार हिंमत बहाद्दर भला ।
त्यानं हात घातला इड्याला ॥
तानाजी सुभेदार पोषाख बदली त्याच जागेला ।
जसा गोंधळी दिसतो नयनाला ॥
वीर मावळा जाऊन पोचला कोंडाण्याचे चौकिला ।
भेटला खंडोजी नायकाला ॥
खंडोजी नाईक सुभेदाराची किर्ती ठाऊक मला ।
तैनात काय देती तुम्हाला ॥
तीन रुपड्याची तैनात देती प्रत्येक शिपायाला ।
तितकच देती नायकाला ॥
फितुर केल खंडू नायकास । म्हणे द्यावा भेद आम्हास ॥
शिवरायाचा सुभेदार । मी इनाम देईन तुम्हास ॥
वाट सांगा कोंडाण्याची । कुठं जागा आहे चढण्यास ॥



कोंडणागड लई अवघड नसे जागा चढण्याला ।
बसाव सांगतो भेदाला ॥

चौक ७ वा

" बाटगा यवन म्हणवि आपणाला "

उदेभान रजपूत अधीकारि आहे या किल्याला ।
बाटगा यवन म्हणवि आपणाला ॥
दिडगाय दिडशेळी सवामण तांदुळ एका येळेला ।
अठरा बेगमा सेजेला ॥
लोखंडाची पहार वाकऊन कारितसे वेटाळा ।
ती सरी घाली बेगमेच्या गळा ॥
बादशाहाचा मस्त हत्ती आहे किल्याला ।
चंद्रावळ नांव असे त्याला ॥
उदेभानाचा प्रधान ' सिद्धी हिलाल ' म्हणती त्याला ।
जसा काय राक्षस निर्जेलेला ॥
अर्धी गाय अदमण तांदुळाचा खुराक लागतसे येळेला ।
नऊजणी बेगमा सेजेला ॥
बारापुत्र ते उदेभानाचे आहे त्याच्या दिमतीला !
अठराशें पठाण शिरगणतीला ॥
त्या उगवत्या बाजूस । कडा आहे तो डोणागिरी ॥
आहे जागा तेथें सोलाची । चढवावि घोरपड भारी ॥
तुम्हीं बसावे आतां मेटेला । दादानो जातो माघारी ॥
गड हातामधीं जरी आला । तर देइन खास सरदारी ॥
भीमकाय तो शाहीर तानाजी आला आपल्या गोटाला ।
घोरपड चढविल पुढल्या चौकाला ॥७॥

## चौक ८ वा

### "शिवरांय देव एक आम्हाला"

मामा म्हणती भलेरे बहाद्दर सुखरुप तूं आला ।
अन नवस केला होता बहिरोबाला ॥
तुझा नवस तो राहुदे जागेला घेऊं या किल्याला ।
शिवराय देव एक आम्हांला ॥
आपल्या सैन्याला हुकूम केला तयार व्हावे युद्धाला ।
बाहेर काढलं यशवंतीला ॥
पूजा-पत्री देऊन तिजला लावला सोल कमरेला ।
यशवंती सोडली चढण्याला ॥
अर्धा गड तो चढून गेली परुत आली जागेला ।
पुढचं भविष्य कळलं बाईला ॥
कृतांतासम वीर खवळुन बोले यशवंतीला ।
भाजुन खाइन याच जागेला ॥
दुसऱ्या वकताला सरसर चढुनी जाऊन बसली जागेला ।
मर्दांनो चढावे गडाला ॥
काय गडबड चालली खोऱ्यांत । ये पहावयाशी गस्त ॥
धनगर वाडी आहे खोऱ्यांत । वाघ शिरला त्यांचे मेंढ्यात ॥
सांगे सूर्याजी बंधूस । कल्याण द्वारावरी करी मात ॥
बानजीसह तो मामा । जाऊन पोचले किल्यांत ॥
मध्यें सोल तुटोनी गेला । वरकड पडले खोऱ्यांत ॥
नरसिंव्ह तानाजी हरहर महादेव गर्जला ।
युद्धाचा भाग पुढल्या चौकाला ॥



## चौक ९ वा

### "मरा कीं मारा शत्रु एक जात"

रात्र अंधेरी गडद काळोखी माघ वद्य नवमी ।
रात्रीची वेळ असे नामी ॥
द्वापारा मंधी युद्ध जाह्लं राम रावणाचं ।
तसंच या कोंडाण्याचं ॥
कोंडाण्यावरी चहूं बाजुला गस्त होती आटोकाट ।
शिराया नाहीं जराशी वाट ॥
गडावरील तें मोंगल सैन्य होतें बिन बोभाट !
वर्णावा काय त्यांचा मी थाट ॥
अफीण चंडोल माजुम खावुनि गर्वा मधी धुंद ।
धरणिवारि पडती बेशुद्ध ॥
वीर मावळे धन्यची सारे किल्ला चढले पार ।
करुनियां गस्त-वाल्यासी ठार ॥
कोंडाण्याचें किल्यांत चालती ढाल पट्याचे हात ।
बिजली चमके आकाशांत ॥
हिंमत बहाद्दर म्हणे मावळ्याला सरा तुम्ही हातोहात ।
मरा कीं मारा शत्रु एक जात ॥
मुखांतुनी चालला हरहर महादेव तो घोष ।
मराठे लढताती बेहोष ॥
मोंगल सैन्यांत गडबड झाली पळती चौकींत ।
दिसतांच जाती स्वर्गांत ॥
हात पाय आणि शिरें कापलीं पडलीं हातोहात ।
गडावरी काळाचा उत्पात ॥

साऱ्या मावळ्यांत विजयानंद किल्याचा छंद ।
रिपु पक्षाचा करिती भंग ॥
ध्वनी प्रचंड रणसिंगाचा भेदी कर्णाला ।
आकाशीं तळपतसे भाला ॥
एकेक चौकी भंग पावली रक्तांचें सरोवर ।
पाट वाहती दूरदूर ॥
मांसाचा तो चिखल जाहला दृश्य भयंकर ।
सुटला शत्रूचा धीर ॥
उदेभानाशि खबर नाहीं निशेमधीं मस्त ।
धावली त्याचे घरीं गस्त ॥
उदेभानरे मेरे सरदार सोडावी चैन ।
कापला नऊशें पठाण ॥
सोडीत नाहीं चैन आपुली गलीम कैसा या ।
शद्ब हे निशेमधीं वाया ॥
यदा कदाचित् गलीम आला जरी धावा हत्ती सोडून ।
पळतिल समरें जिवाच्या भितीन ॥
दारू कुसुंबा त्यासी पाजून दिला हत्ती सोडून ।
सोंडे मधीं पट्टे बांधून ।
तानाजीचा आणि हत्तीचा चाले रणकल्लोळ ।
गगनि जाति धुळीचे लोळ ॥
एका वारामंधी त्या हत्तीची कापली त्यानं मान ।
जासुद गेला धाऊन ॥
उदेभानासी जासुद बोले हत्ती झाला ठार ।
आतां तरि उपसा तुम्ही तलवार ॥





सिद्धीस सांगा दरम्यांत । कांपला हत्ती आणि म्हात ॥
असा कोण शत्रु रणमस्त । त्यांस मारून यावें त्वरित ॥
बेगमांचा करुनिया घात । सिद्धी चढवि पट्टा हातात ॥
युद्धासी सामोरा येतांच । त्याचें शिर उडलें गगनांत ॥
मोंगल झाले हताश सारे वदती अल्ला अल्ला ।
रंगतो पुढच्या चौकाला ॥९॥

चौक १० वा

" भासे काळाचा अवतार "

उदेभानाचे बारा पुत्र हातीं धरूनी तलवार ।
म्हणती मावळे करुं आम्हीं ठार ॥
तानाजी म्हणे त्या पुत्रासी परत जावें माघारी ।
फुकट कां? जातां यमद्वारी ॥
पुत्र म्हणाले त्या वीरासी अर्धी ये तूं समरीं ।
होऊं मोक्षाचे अधिकारी ॥
समर-धीर तो करी पट्याचे दहा पांच हात ।
पुत्र पहाती यमपंथ ॥
सर्व पुत्रही ठारची झाले दिली त्यास खबर ।
शत्रु सैन्याचा सुटला धीर ॥
पुत्रांचें ते दुःख कराया नाहीं त्यासी वेळ ।
असाच येऊन पोंचला काळ ॥
बाटग्याचा तो कैफ पळाला खचला त्याचा धीर ।
परी हिंमत दावतो वरवर ॥
किल्यामाजीं मावळे मोजितां पन्नास भरलं स्मरं ।
म्हणे एका बारांत करिन ठार ॥

१४

शिवबाला लइ दुःख झाहलं बोलवा संमद्या मावळ्याला।
गडाकरतां सिंव्ह बळी पडला ॥
आज पासूनी या किल्याला म्हणा सिंव्हगड ।
" तानाजिची किर्ती नऊ खंड ॥
जिजा मातेला खबर कळतां अश्रु येति नयनाला।
' तानाजिपुत्र कसा रुसला ' ॥
रायबा बेट्याला कळलं सार तानाजी स्वर्गी गेला।
अन् बाबा मी म्हणू कोणाला ॥
शिवाजी राजे म्हणती रायबाला शिवाजी स्वर्गी गेला।
तानाजी आहे या जागेला ॥
तेरा दिवसानंतर राया बसला आपल्या सदरेला ।
सुभेदारि दिधली रायबाला ॥
सत्ताविस किल्याचा अधिकार दिधला रायबाला ।
पालखीचा मान तसाच त्याला ॥
पहिली नवरी रद्द करोनी आणलि दुसरि लग्नाला ।
मंडप शिवाचे द्वाराला ॥
काम पाहुनी सर्व वीरांचें । सैन्यास दिला ईनाम ॥
कित्येकास कंठी आणि तोडे । इतरास रोकड दाम ॥
आणावा पुण्याचा शाहीर । तया तुळशीदास हे नाम ॥
तुण तुण घेऊन शाहीर । रायास करी रामराम ॥
सिंव्हगडचा रण संग्राम । गाऊन दावी उत्तम ॥
एक हजार रोकड दाम । शाहीरास दिले ईनाम ॥
मर्द विरांचा मर्द पोवाडा मर्दच ऐकति जागेला ।
" जय तानाजी कि जय बोला "